प्राप्त दिनांक : २१/११/२०११
नोंदणी दिनांक : २९/११/२०११

निर्णय दिनांक : १४/०८/२०१४

कालावधी : ०२व. ०८म.२३ दि

३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पंढरपूर यांचे

न्यायालयात

(पिठासन अधिकारी सौ. एन.एम. जमादार)

नियमित दिवाणी दावा क्र. ५२८/११.. निशाणी क्र.

मारूती आसबे, वय.४८ वर्षे }
धंदा शेती, रा.सरकोली, ता.पंढरपूर } वादी.
जि. सोलापूर. }

विरुध्द

१.मारूती आप्पा आसबे, वय८० वर्षे }
धंदा—शेती, रा.खरसोळी, ता.पंढरपूर }
२.द्रोपदाबाई मारूती आसबे, वय ७८ वर्षे }
धंदा. घरकाम, रा.सदर }
३.रमेश मारूती आसबे, वय ५५ वर्षे }
धंदा. घरकाम, रा.सदर }
४.उत्तम मारूती आसबे, वय. ४६ वर्षे } प्रतिवादी
धंदा.शेती, रा.सदर }
५.प्रल्हाद मारूती आसबे, वय ४४ वर्षे }
रा.सदर
६.अरूण एकनाथ आसबे, वय ५५ वर्षे }
धंदा.शेती, रा. सदर

७. गोकुळा अरूण आसबे, वय ४८ वर्षे }
धंदा.घरकाम, रा. सदर }

८. रंजना दामोदर दत्तू, वय ४३ वर्षे }
धंदा घरकाम, रा.डोंगरगांव, ता.मंगळवेढा } प्रतिवादी
जि.सोलापूर

९. आप्पा उत्तम आसबे, वय २२ वर्षे }
धंदा.शेती, रा.खरसोळी, ता.पंढरपूर }
जि.सोलापूर

---

दावा :—सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जेत मिळणेसाठी.
कोर्टाचे अधिकारासाठी दावा रू.१,०००/—

अॅड. श्री.अे.एन.पाटील, वादीकरीता
अॅड. श्री.पी.पी.मोहिते प्रतिवादी क्र. १,४,९ करीता
अॅड. श्री.बी.एन.लामकाने, प्रतिवादी क्र. ३ करीता
अॅड. श्री.व्ही.के.जाधव, प्रतिवादी क्र. ६ करीता
प्रतिवादी क्र. २, ५, ७, ८ एकतर्फा

## :: न्या य नि र्ण य ::

(निकाल तारीख १४.८.२०१४)

१. वादीने सदरचा दावा हा वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे दाव्यातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

मौजे खरसोळी ता. पंढरपूर येथील गट नं.४९ त्यातील एक चालू पाण्याची विहीर त्यावर ३ एच.पी.ची इलेक्ट्रीक मोटार व

कनेक्शनसह, ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ७२ या मिळकती सदर दाव्याचा विषय असून या मिळकती दावा मिळकती म्हणून संबोधल्या जातील.

३. वादी व प्रतिवादींची लागुपुरती वंशावळ खालीलप्रमाणे आहे.

आप्पा (मुळ पुरूष)

मारूती प्र.वादी क्र.१ । एकनाथ/मयत

द्रोपदाबाई प्र.वादी नं.२ ।

| रमेश | तानाजी | उत्तम | प्रल्हाद | रंजना | अरूणा | गोकुळा |
|---|---|---|---|---|---|---|
| । | । | । | । | । | । | । |
| प्र.नं३ | वादी | प्र.वा.नं.४ | प्र.वा.नं.५ | प्र.वा.नं.८ | प्र.वा.नं६ | प्र.वा.नं.७ |
| | | आप्पा | | | | |
| | | । | | | | |
| | | प्र.वा.नं.९ | | | | |

४. वादी हा प्रतिवादी क्र. १, २ चा मुलगा असून प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे वादीचे भाऊ आहेत. प्रतिवादी नं. ६ आणि ७ हे वादीचे चुलत भाउ आणि भावजय असून प्रतिवादी नं. ८ ही वादीची बहिण आहे. प्रतिवादी नं. ९ हे प्रतिवादी नं. ४ चा मुलगा आहे.

५. दावा मिळकती वादीचे आजोबा आप्पा यांच्या वाडवडिलार्जीत मालकी वहिवाटीची होय. मयत आप्पा यास एकनाथ व मारूती अशी दोन मुले होती. एकनाथ मयत झाला असून एकनाथ व मारूती यांनी मौजे तारापूर येथील जमीनी पुर्वीच वाटून घेतलेल्या होत्या व त्या विकलेल्या आहेत. गट नं. ४९ चे मारूती आणि एकनाथ मध्ये वाटप होवून पूर्वेकडील

निम्मा भाग हा एकनाथचे हिश्यास देणेत आला होता व त्याचे मृत्यूनंतर प्रतिवादी क्र. ६ याचे नांव वारसा हक्काने लागले त्यानंतर त्याने त्याची पत्नी प्रतिवादी नं. ७ हिचे नांवे खरेदीचा दस्त केला आहे. प्रतिवादी क्र. १ व ७ याचे नांव रेकॉर्डला एकत्रात दाखल असल्याने तिला या कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील केले आहे.

६. दावा मिळकतीचे वादी प्रतिवादी क्र. १ ते ६, ८ यांचेत वाटप झालेले नाही, त्या आजही एकत्र कुंटूंबाच्या मिळकती आहेत. दावा मिळकतीतील वादीचा हिस्सा बुडविण्याचे हेतुने प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र. ४ व ५ चे नांवे दिनांक १०.१२.२०१४ रोजी प्रत्येकी ०.३२ आर विक्री केल्याचे तसेच प्रतिवादी क्र. ३ च्या नांवे दिनांक १०.२.२०१० रोजी केल्याचे समजले. सदर दस्तास वादीची संमत्ती नव्हती व नाही. प्रतिवादी नं. १ याने दावा जमीनीपैकी ०.३२ आर क्षेत्राची खरेदी दिनांक १५.३. २०११ रोजी प्रतिवादी क्र. ९ च्या नांवे केली. सदरचा दस्त हा वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही. वादीस दावा मिळकतीत १/१४ हिस्सा आहे. मात्र प्रतिवादींनी सदरचा हिस्सा वाटून देण्यास नकार दिला म्हणून वादीने सदरचा दावा दाखल केला आहे.

७. प्रतिवादी नं. १, ४, ९ यांनी सदर दाव्यास त्यांची कैफीयत दाखल केली नाही. त्यामुळे त्यांचेविरूध्द दावा विना कैफीयत चालविणेचा तसेच प्रतिवादी क्र. २, ५, ७, ८ यांचेविरूध्द एकतर्फाचा आदेश नि. १ वर पारित केला आहे.

८. नि. २७ वर प्रतिवादी क्र. ३ ने त्याची कैफीयत सादर केली असून दाव्याचे मिळकतीचे वर्णन व नातेसंबंध मान्य केले आहे. परंतु त्याने प्रतिवादी क्र. ३ ते ५ व ९ यांच्या हक्कात करून दिलेले खरेदी खते पोकळ, बिन भरण्याचे व वादीचे संमत्तीविना दस्ते अस्तित्वात आणलेले आहेत या बाबी नाकारलेल्या आहेत. तसेच सदरचा खरेदीचे दस्ते हे वादीच्या हिश्यावर बंधनकारक नाही या बाबी नाकारलेली आहेत. खरेदी खताप्रमाणे तो मालक झाला असल्याचे कथन केले असले तरी सविस्तर त्याने असेही कथन केले आहे की, सदरचे वाटप कायदेशीर नाही या मताशी कोर्ट आले तर या प्रतिवादीस योग्य तो हिस्सा मिळावा.

९. दाव्यातील आणि कैफीयत मधील कथने विचारात घेवून नि. २७ वर मुददे प्रस्थापित केले आहेत. सदर मुददे व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| **मुददे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १.वादी याने प्रतिवादी क्र. १ ने प्रतिवादी क्र.३, ४, ५, ९ यांच्या हक्कात करून दिलेली खरेदी खते त्याच्यावर बंधनकारक नाही हे सिध्द केले आहे का? | होय. |
| २.वादीने दावा मिळकतीत त्यास हिस्सा असल्याचे सिध्द केले आहे का? असल्यास किती? | होय, १/१४ हिश्याने. |
| ३.वादी हा वाटपाची व प्रथक कब्जाची दाद मिळण्यास पात्र आहे काय? | होय. |

| | |
|---|---|
| ४.वादी हा हक्क ज्ञापनाची दाद मिळणेस पात्र आहे का? | होय |
| ५.काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**का र ण मि मां सा**

१०. नि.२९ वर वादीने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. नि.३५ वर गट नं. ४९ चा ७/१२ उतारा, नि.३६ वर मालमत्ता क्र. ७२ चा उतारा, नि.३७ वर फेरफार क्र. ४३२ चा उतारा, नि.३८ वर फेरफार क्र.१७७२ चा गांव नमुना नं. ८ अ चा हक्क पत्रकाचा उतारा सादर केलेला आहे.

११. नि. ३१ वर प्रतिवादी नं. ३ ने स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. याशिवाय नि.३४ सोबत प्रतिवादी क्र.१ याने प्रतिवादी क्र. ३, ४, ५ व ९ यांना करून दिलेल्या खरेदी खताची सत्यांकित प्रत सादर केलेली आहेत. नि.३२ वर प्रतिवादी क्र. ३ ने तोंडी पुरावा संपलेबाबत पुरसिस दिली आहे. वादी प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐंकला.

**मुददा क्र. १ बाबत** :—

१२. वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. १ याने वादीचे संमत्तीशिवाय गट नं.४९ मधील काही भाग प्रतिवादी क्र. ३, ४, ५ व ९ यांना विक्री केलेला आहे. वादीचे म्हणणेनुसार गट नं. ४९ ही

मिळकत वाडवडिलार्जीत आहे. त्यामुळे वादीस सदर मिळकतीत जन्मत: अधिकार आहे आणि वादीचे संमत्तीशिवाय सदरची खरेदी खते करता येणार नाहीत. त्यामुळे सदरची खरेदी खते त्यांचेवर बंधनकारक नाहीत. या कथनांच्या पुष्ठयर्थ वादीने तोंडी पुरावा दिला आहे. सदर सरतपासातील कथने ही उलट तपास घेवून नाकारणेत आलेली नाहीत. त्यामुळे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील कथने विना अव्हानित राहिलेली आहेत. याशिवाय फेरफार क्र.४३२ चा उतारा पाहता गट नं. ४९ ही जमीन आप्पा आसब म्हणजे वादीचे आजोबा यांच्या मालकीची होती असे दिसते म्हणजेच सदरची जमीन वाडवडिलार्जीत होती त्यामुळे वादीस जन्मजात हिस्सा या जमीनीत आहे. सदरची खरेदी खते वादीचे संमत्तीने केली याचा कोणताही पुरावा नाही. एकुणच सदर जमीनीत वादीस हिस्सा आहे. त्यामुळे सदरची खरेदी खते ही बंधनकारक होत नाहीत. त्यामुळे या मुददयाचे निष्कर्ष मी होकारार्थी देत आहे.

**<u>मुददा क्र. २ बाबत</u>** :—

१३. गट क्र. ४९ ही जमीन वडिलार्जीत असल्याचे वादीने सिध्द केले आहे. त्यामुळे वादी हिस्सा मिळणेस पात्र आहे. मालमत्ता क्र. ७२ ही प्रतिवादी क्र. ६ चे वडिल एकनाथचे व वादीचे वडील यांच्या नांवे दिसुन येते. परंतु सदर मिळकतीत एकनाथ व मारूती यांच्यात वाटप झालेले दिसून येत नाही. तसेच एकनाथ व मारूती यांनी सदर मिळकत एकत्रीत स्वकमाईने खरेदी केलेली आहे याचाही पुरावा दिसून येत नाही. वादीने शपथेवर घर मिळकत ही वडिलार्जीत असल्याचे कथन केले आहे व सदर मिळकतीचा उतारा या बाबीला दुजोरा देतो त्यामुळे मिळकत क्र.७२ ही

वडिलार्जीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्या मिळकतीत वादीस हिस्सा मागता येईल. एकनाथ व मारूती यांचेत गट नं. ४९ या जमीनीचे वाटप झालेले आहे ही बाब विवादीत नाही त्यामुळे वादी हा मारूती यास मिळालेल्या १/२ हिश्यात हिस्सा मिळणेस पात्र आहे. मारूती व त्याची चारही मुले यांना जन्मत: या मिळकतीत अधिकार प्राप्त आहे. याशिवाय वादीने वाटप मागितले असल्यामुळे मारूतीची पत्नी द्रोपदा हिलाही हिस्सा प्राप्त होतो. तसेच मारूतीची मुलगी हिलाही कायदयाप्रमाणे हिस्सा मिळतो. सबब वादी हा १/१४ हिस्सा मिळणेस प्राप्त आहे. त्याचप्रमाणे घर मिळकत क्र. ७२ मध्ये वादी स्वत: १/१४ हिस्सा मिळणेस पात्र आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र. ९ आणि ७ हे हिस्सा मिळणेस पात्र नाहीत. परंतु प्रतिवादी क्र. ६ हा त्याच्या वडिलांचा १/२ हिस्सा मिळणेस पात्र आहे. वादी प्रतिवादी क्र. १ ते ५, ८ हे प्रत्येकी १/१४ इतका हिस्सा मिळणेस पात्र आहेत. त्यामुळे मी या मुददा क्र. २ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुददा क्र.३ ते ५** :—

१४. वादी हा दावा मिळकतीचे वाटप मागणेस पात्र आहे. त्यामुळे मी मुददा क्र.३ चा निप्कर्ष होकारार्थी देत आहे तसेच वादीने प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र. ३, ४, ५ व ९ यांच्या हक्कात करून दिलेली खरेदी खते त्याचेवर बंधनकारक नाही असे सिध्द केले असल्यामुळे तो त्या अनुषंगाने हक्क ज्ञापनाची दाद मिळण्याची पात्र आहे म्हणून मी मुददा क्र. ५ सिध्द केलेला आहे व खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. वादीचा दावा खर्चास मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ याने प्रतिवादी क्र. ३ ते ५ व ९ यांच्या हक्कात करून दिलेली खरेदी खते वादीवर बंधनकारक नाहीत असे घोषित करण्यात येते.

३. वादी हा दावा मिळकतीत १/१४ इतका हिस्सा व त्याचा पृथक कब्जा मिळण्यास पात्र आहे.

४. प्रकरण दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ५४ प्रमाणे वाटपासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे पाठविण्यात यावे.

५. ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ७२ चे वाटप कोर्ट कमिशनर मार्फत करण्यात यावे.

येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या व्यासपिठावर जाहिर करण्यात आला)

दिनांक: १४.८.२०१४.

(सौ.एन.एम.जमादार)
३ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्त
पंढरपूर